भिवंडी नि. शहर महानगरपालिका, भिवंडी.

जि.ठाणे.

संदर्भ - शासन परिपत्रक क्रमांक-आरएलपी-०६२४/प्र.क्र.१४४/विशा १ व, दि.२९ सप्टेंबर, २०२१ रोजीचे परिपत्रक

घरगुती व सार्वजनिक गणेशोत्सव साजरा करणा-या भाविकांना मार्गदर्शक सुचना.

उपरोक्त संदर्भित शासन परिपत्रकानुसार देण्यात आलेल्या खालील प्रमाणे सुचना देण्यात येत आहेत. सन २०२१ मध्ये मार्च महिन्यापासून कोविड- १९ साथरोगाचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणावर झाला आहे. या आपत्तीपासून स्वतःचे व कुटुंबीयांचे संरक्षण करुनच गणेशोत्सव साजरा करणे आवश्यक आहे.

यासाठी यावर्षीच्या (सन-२०२१ च्या) गणेशोत्सवादरम्यान खालील निर्बंध पाळण्यात यावेत, असे आवाहन भिवंडी नि.शहर महानगरपालिकेतर्फे भाविकांच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून करण्यात येत आहे.

- सार्वजनिक गणेशोत्सवासाठी गणेशोत्सव मंडळांनी महापालिका/ स्थानिक प्रशासन यांची त्यांचे धोरणानुसार यथोचित पूर्वपरवानगी घेणे आवश्यक राहील.
- कोविड-१९ मुळे उद्भवलेल्या संसर्गजन्य परिस्थितीचा विचार करता तसेच मा. न्यायालयाने निर्गमित केलेले आदेश आणि महापालिका तसेच संबंधित स्थानिक प्रशासनाचे मंडपांबाबतचे धोरण यांचेशी सुसंगत असे मर्यादित स्वरुपाचे मंडप उभारण्यात यावेत. या वर्षीचा गणेशोत्सव साध्या पध्दतीने साजरा करणे अपेक्षित असल्याने घरगुती तसेच सार्वजनिक गणपतींची सजावट करतांना त्यात भपकेबाजी नसावी.पर्यावन पुरक असावी थर्माकॉल व प्लास्टीकचा वापर नसावा.
- श्रीगणेशाची मुर्ती सार्वजनिक मंडळांकरिता ४ फ़ूट व घरगुती गणपती २ फ़ूटांच्या मर्यादेत असावी.
- या वर्षी शक्यतो पारंपारिक गणेशमुर्तीऐवजी घरातील धातू/संगमरवर आदी मुर्तीचे पूजन करावे. मुर्ती शाडूची/पर्यावरणपूरक असल्यास त्याचे विसर्जन शक्यतो घरच्या घरी करावे. विसर्जन घरी करणे शक्य नसल्यास नजिकच्या कृत्रीम विसर्जन स्थळी विसर्जन करण्यात यावे. गणेशमुर्तीचे विसर्जन पुढे ढकलणे शक्य असल्यास या मुर्तींचे विसर्जन माघी गणेशोत्सव विसर्जनावेळी किंवा २०२२ च्या भाद्रपद महिन्यात पुढील वर्षीच्या विसर्जनाच्या वेळी करता येणे शक्य आहे. जेणेकरुन आगमन/विसर्जनासाठी गर्दीत जाणे टाळून स्वतः व कुटुंबियांचे कोरोना साथीच्या रोगापासून रक्षण होईल.
- उत्सवाकरिता वर्गणी/देणगी स्वेच्छेने दिल्यास त्यांचा स्वीकार करावा. जाहिरातींच्या प्रदर्शनामुळे गर्दी आकर्षित होणार नाही असे पहावे. तसेच आरोग्य विषयक व सामाजिक संदेश असलेल्या जाहिराती प्रदर्शित करण्यास पसंती देण्यात यावी.
- सांस्कृतिक कार्यक्रमाऐवजी आरोग्य विषयक उपक्रम/शिबीरे उदा.रक्तदान,आयोजित करण्यास प्राधन्य देण्यात यावे आणि त्याद्वारे कोरोना,मलेरिया,डेंग्यु इ. आजार आणि त्यांचे प्रतिबंधात्मक उपाय तसेच स्वच्छता यांबाबत जनजागृती करण्यात यावी.
- आरती, भजन, किर्तन व अन्य धार्मिक कार्यक्रम आयोजित करतांना गर्दी होणार नाही तसेच ध्वनि प्रदुर्षणासंदर्भातील नियमांचे व तरतुदींचे पालन करण्यात यावे.
- श्रीगणेशाचे दर्शनाची सुविधा ऑनलाईन, केबल नेटवर्क, वेबसाईट व फ़ेसबुक इत्यादीद्वारे उपलब्ध करुन देण्याबाबत जास्तीत जास्त व्यवस्था करण्यात यावी.

- गणपती मंडपांमध्ये निर्जंतुकीकरणाची तसेच थर्मल स्क्रीनिंगची पर्याप्त व्यवस्थ करण्यात यावी. प्रत्यक्ष येऊन दर्शन घेऊ इच्छिणा-या भाविकांसाठी शरिरीक अंतराचे (फ़िजिकल डिस्टन्सींग) तसेच स्वच्छतेचे नियम (मास्क,सॅनीटीयझर इत्यादी) पाळण्याकडे विशेष लक्ष देण्यात यावे.
- श्रींच्या आगमन व विसर्जन मिरवणूका काढण्यात येऊ नयेत. विसर्जनाच्या पारंपारिक पध्दतीत विसर्जन स्थळी होणारी आरती घरीच करुन विसर्जन स्थळी कमी वेळ थांबावे. लहान मुले आणि वरीष्ठ नागरिकांनी सुरक्षेच्या दृष्टीने विसर्जनस्थळीजाणे जाणे टाळावे. संपूर्ण चाळींतील/इमारतीतील सर्व घरगुती गणेशमुर्तींच्या विसर्जनाची मिरवणूक एकत्रितरित्या काढण्यात येऊ नयेत.
- महापालिका,विविध मंडळे, गृहनिर्माण संस्था, लोक प्रतिनिधी, स्वयसेवी संस्था इत्यादींच्या मदतीने कृत्रीम तलावांची निर्मिती करण्यात यावी.
- कोविड-१९ या विषाणचा प्रादुर्भाव रोख्ण्यासाठी शासनाच्या मदत व पुनर्वसन, आरोग्य, पर्यावरण, वैद्यकीय शिक्षण विभाग तसेच सबंधित महापालिका, पोलीस, स्थानिक प्रशासन यांनी विहित केलेल्या नियमांचे अनुपालन करणे बंधनकारक राहील. तसेच या परिपत्रकानंतर व प्रत्यक्ष सण सुरु होण्याच्या मधल्या कालावधील अजुन काही सूचना प्रसिध्द झाल्यास त्यांचे देखील अनुपालन करावे.
- घरगुती गणेशमूर्तींचे आगमन मिरवणुकीच्या स्वरुपात नसावे. आगमनप्रसंगी मास्क/शिल्ड, सॅनिटाझर,सामाजिक अंतर इ. स्वसंरक्षणाची साधने काटेकोररीत्या वापरण्यात यावीत.
- घरगुती गणेशमूर्तीची स्थापना करणा-या भाविकांनी दर्शनास येणा-या व्यक्तींना मास्क परिधान करण्यास आग्रह धरावा तसेच त्यांच्यासाठी सॅनेटाझरची व्यवस्था करावी.
- भिवंडी महानगरपालिका/पोलीस प्रशासन यांनी घालून दिलेल्या नियमांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.
- घर/इमारत गणेशोत्सव कालावधीत प्रतिबंधित क्षेत्र म्हणून जाहीर केल्यास प्रतिबंधित क्षेत्र नियमांचे पालन करण्यात यावे.

तरी याकामी महानगरपालिका प्रशासन व पोलीस प्रशासनास सहकार्य करावे.

मा. श्री. सुधाकर देशमुख
आयुक्त,
भिवंडी नि. शहर महानगरपालिका

मा. सौ. प्रतिभा विलास पाटील
महापौर,
भिवंडी नि. शहर महानगरपालिका